क्र. १५५ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

३० जुलै २०२३

## सामान्यकाळातील सतरावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशूने पाच भाकऱ्या व दोन मासे यांची पाच हजारांना मेजवानी दिली. येशूचा चमत्कार म्हणजे एक अलौकिक कृत्य होते. पाच भाकऱ्या आणि दोन मासे ह्यांचे जेवण पाच हजार लोकांनी खाऊन तृप्त झाल्यावर बरेचसे अन्न उरले. परमेश्वराच्या दैवी वैभवात भोजनाद्वारे प्रभू येशूने सर्वांना सहभागी केले. पवित्र मिस्साबलीत सहभागी होऊन ख्रिस्तशरीर स्वीकारून प्रभू भोजनाचा आस्वाद घेण्यास व आपले नूतनीकरण होण्यास प्रभूची कृपा मिळावी म्हणून प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे परमेश्वरा, आमच्या स्वर्गीय बापा व संरक्षका, तुझ्याशिवाय सगळेच अपवित्र व मूल्यहीन आहे. तू जगाला दिलेल्या वरदानांचा आम्ही योग्यप्रकारे उपयोग करावा व सार्वकालिक जीवन मिळवावे म्हणून आम्हांला मार्गदर्शन कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**एक राजे या पुस्तकातून घेतलेले वाचन ३:५,७-१२**

**"तू न्याय करण्याची विवेकबुध्दी मागितलीस."**

गिबोन येथे परमेश्वराने रात्री स्वप्नात शलमोनला दर्शन दिले. येशूने त्याला म्हटले, "तुला पाहिजे तो वर माग, तो ती तुला देईन." शलमोनने म्हटले, "आता हे माझ्या देवा परमेश्वरा, तू आपल्या सेवकास माझा बाप दाविद याच्या जागी राजा केले आहे, पण मी तर केवळ लहान मूल आहे; चालचलणूक कशी ठेवावी ते मला कळत नाही. तसेच तू निवडलेल्या लोकांमध्ये तुझा सेवक राहत आहे; त्या लोकांचा एवढा समुदाय आहे की, ते असंख्य आणि अगणित आहेत. तेव्हा आपल्या सेवकास तुझ्या लोकांचा न्याय करण्यास सावधान चित्त दे म्हणजे मला बऱ्यावाईटाचा विवेक करता येईल. एवढ्या मोठ्या प्रजेचा न्याय करण्यास कोण समर्थ आहे?"

शलमोनने हा वर मागितला म्हणून त्याच्या ह्या भाषणाने प्रभू त्याच्यावर प्रसन्न झाला. देव त्यास म्हणाला, "तू असला वर मागितलास दीर्घायुष्य, धन, आपल्या शत्रूंचा नाश यापैकी काही न मागता तू न्याय करण्याची विवेकबुध्दी मागितलीस. म्हणून मी तुझ्या म्हणण्याप्रमाणे करतो, मी तुला बुध्दिमान आणि विवेकी चित्त देतो. तुझ्यासारखा पूर्वी कोणी झाला नाही आणि पुढे होणार नाही."

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**११८:५७,७२,७६-७७, १२७-१२८, १२९-१३०**

प्रतिसाद : **तुझे नियमशास्त्र मला किती प्रिय आहे!**

१. परमेश्वर माझा वाटा आहे. तुझी वचने पाळण्याचा मी निश्चय केला आहे. सोन्यारुपाच्या लक्षावधी नाण्यांपेक्षा तुझ्या तोंडचे नियमशास्त्र मला मोलवान आहे.

२. तू आपल्या सेवकाला दिलेल्या वचनानुसार तुझ्या वात्सल्याने मला सांत्वन प्राप्त होऊ दे. माझ्यावर करुणा कर म्हणजे मी जगेन; कारण तुझ्या नियमशास्त्रात मला आनंद आहे.

३. ह्यापुढे मी तुझ्या आज्ञा सोन्यापेक्षा, बावनकशी सोन्यापेक्षा प्रिय मानतो. ह्यामुळे सर्व बाबीसंबंधाने तुझे सर्व आदेश यथायोग्य आहेत असे मी मानतो. आणि प्रत्येक असत्य मार्गाचा मी द्वेष करतो.

४. तुझे निर्बंध आश्चर्यकारक आहेत, म्हणून मी ते पाळतो. तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो, त्याने भोळ्यांना ज्ञान प्राप्त होते.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ८:२८-३०**

**"देवाने आपणाला आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून योजले आहे."**

आपल्याला ठाऊक आहे की, देवावर प्रीती करणाऱ्यांस म्हणजे त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलावलेल्यांस देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. कारण ज्यांच्याविषयीचे त्याला पूर्वज्ञान होते त्यांनी आपल्या पुत्राच्या प्रतिमेप्रमाणे बनावे म्हणून त्याने त्यांना अगोदरच नेमून ठेवले; ह्यात हेतू हा की, तो पुष्कळ बंधुजनांमधला ज्येष्ठ असा व्हावा, ज्यांना त्याने अगोदर पाचारणही केले. त्यांना त्याने नीतिमानही ठरवले आणि ज्यांना त्याने नीतिमान ठरवले त्यांचा त्याने गौरवही केला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १४:६**

**आलेलुया, आलेलुया!**

मार्ग, सत्य आणि जीवन मीच आहे; माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत मत्तयच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ३:४४-५२**

**"तो आपले सर्वस्व विकतो आणि ते शेत विकत घेतो."**

संक्षिप्त रुपासाठी चरण (४४-४६) वापरता येतील.

(येशूने लोकसमुदायांस म्हटले, "स्वर्गाचे राज्य शेतात लपवलेल्या ठेवीसारखे आहे. ती कोणा एका मनुष्याला सापडली आणि त्याने ती लपवून ठेवली. मग आनंदाच्या भरात तो जातो, आपले सर्वस्व विकतो आणि ते शेत विकत घेतो."

"आणखी स्वर्गाचे राज्य समुद्रात टाकलेल्या एखाद्या जाळ्यात सर्व

आणि ते शेत विकत घेतो.''

''आणखी स्वर्गाचे राज्य समुद्रात टाकलेल्या एखाद्या जाळ्यात सर्व प्रकारचे जीव एकत्र सापडतात त्यासारखे आहे; ते भरल्यावर माणसांनी ते किनाऱ्याकडे ओढले आणि बसून जे चांगले ते भांड्यात जमा केले, वाईट ते फेकून दिले. तसे युगाच्या समाप्तीस होईल. देवदूत येऊन नीतिमानातून दुष्टांना वेगळे करतील आणि त्यांना अग्नीच्या भट्टीत टाकतील; तेथे रडणे आणि दात खाणे चालेल.''

''तुम्हाला ह्या सर्व गोष्टी समजल्या काय?'' ते त्याला म्हणाले, ''होय.'' तेव्हा तो त्यांना म्हणाला, ''प्रत्येक शास्त्री जो स्वर्गाच्या राज्याचा शिष्य झाला आहे तो आपल्या भांडारातून नव्या जुन्या गोष्टी काढणाऱ्या गृहस्थासारखा आहे.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रस्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आमच्या तारणाचे रहस्य साजरे करण्यासाठी ख्रिस्ताठायी आम्ही येथे एकत्र जमलो आहोत. जीवन आणि आशीर्वादाचा हा झरा अखिल जगाला खुला करण्यासाठी आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे याचना करू या.

आपला प्रतिसाद असेल – **ऐकावी प्रार्थना करितो मी याचना.**

१. आपले पोप, कार्डिनल्स, बिशप्स, फादर्स, सिस्टर्स व प्रापंचिक यांना प्रभूची सुवार्ता जगाच्या कानाकोपऱ्यात पसरविण्यास प्रभू येशूची कृपा लाभावी म्हणून प्रार्थना करूया.
२. जे लोक आजारी आहेत त्यांच्या आजारपणात त्यांना प्रभूची कृपा व शक्ती मिळावी म्हणून प्रार्थना करुया.
३. जे तरुण प्रभूपासून दूर गेलेले आहेत, ज्या युवकांना नोकरी नाही त्यांना योग्य तो मार्ग मिळावा म्हणून आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.
४. प्रसंगानुसार हेतू सादर करणे.
५. आता आपण थोडावेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे सर्वसमर्थ पित्या, तुझ्या लोकांच्या प्रार्थना ऐक. तुझ्या प्रेरणेमुळे श्रध्देने आम्ही तुझ्याकडे प्रार्थना करतो. त्यांचा तू स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, तू आम्हांला दिलेल्या दानांमधूनच आम्ही तुला ही दाने अर्पण करीत आहोत. या दानांद्वारे आम्हांला पवित्र कर व सार्वकालिक आनंदात सहभागी कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रभो, तुझा पुत्र ख्रिस्त ह्याचा मृत्यू व पुनरुत्थान ह्यांच्या स्मृतीचा संस्कार आम्ही स्वीकारला आहे. या संस्काराच्या कृपासामर्थ्याद्वारे आम्हांला शाश्वत तारणाच्या जवळ ने. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

मनुष्य आपल्या जीवनामध्ये कसल्या ना कसल्या तरी खजिन्याच्या शोधात असतो. योग्य खजिना योग्यवेळी त्याला गवसला तर त्याचे जीवन समृध्द व सुसंपन्न बनू शकतो. जीवनात माणसाने कोणत्या प्रकारच्या खजिन्याची आस धरावी त्याविषयी आजची वाचने आपल्याला मार्गदर्शन करताना आढळतात.

**अ) विवेकबुध्दीचे वरदान :** प्राचीन इस्राएलचे राजे दीर्घायुष्य, धनसंपदा आणि शत्रूंवरील विजय अशा स्वरुपाची वरदाने परमेश्वराजवळ मागत. परंतु आजच्या पहिल्या वाचनात (१ राजे ३:५, ७-१२) सॉलोमन राजा देवाकडे विवेकबुध्दीचे वरदान मागतो. स्वत:च्या स्वार्थी हेतूंपेक्षा सर्वांचे सार्वजनिक हित नजरेसमोर ठेवल्याने सॉलोमन राजाच्या ज्ञानाची ख्याती सर्वत्र पसरली. यहुदी ज्ञानसाहित्याचा जनक म्हणून तो नावारुपाला आला.

**ब) परमेश्वराविषयीची ओढ :** दुसऱ्या वाचनात (रोम.८:२८-३०) संत पौल रोमकरांस कळवितो की, परमेश्वरावर प्रेम करणाऱ्यांना त्याच्या सुसंकल्पाप्रमाणे सर्व गोष्टी हितकारक होतात. देवविषयक ओढ बाळगण्याने त्यांना देवाची योजना प्रकट होते, देवाच्या हाकेला ते मोकळ्या मनाने होकार देतात, ते नीतिमान जीवन जगताप आणि परमेश्वराकडून त्याचा गौरव होतो.

**क) देवराज्य प्रस्थापित करण्याची तळमळ :** शुभवर्तमानात (मत्तय १३:४४-५२) एकूण चार दाखले देण्यात आलेले आहेत. माणसाने मौल्यवान अशा गोष्टींच्या शोधात असावे, ह्या गोष्टींची पुरती पारख करावी, त्यासाठी आवश्यक ती किंमत मोजायला तयार असावे, चांगल्या गोष्टींचा संचय व संरक्षण करावे, वाईट गोष्टी जीवनातून वजा करीत राहावे आणि नव्या-जुन्या गोष्टींचे भांडार भरून ठेवावे. अशातून देवराज्य प्रस्थापित करण्याची त्याची तळमख दिसून येऊ शकेल.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनात मला योग्य असा खजिना सापडला आहे का? त्यासाठी मी कोणती किंमत मोजायला तयार आहे? ●●●

| जुलै/ऑगस्ट २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम ३१ | सं इग्नेशियस लोयोला (पां) | : निर्गम ३२:१५-२४,३०-३४/मत्तय १३:३१-३५ |
| मंगळ ०१ | सं आल्फान्सो लिगरी (पां) | : निर्गम ३३:७-११, ३४:४-९,२८/मत्तय १३:३६-४३ |
| बुध ०२ | वर्सेलियाचा सं युसेबियुस (हि) | : निर्गम ३४:२९-३५/मत्तय १३:४४-४६ |
| गुरू ०३ | सं लिडिया (हि) | : निर्गम ४०:१६-२१, ३४-३८/मत्तय १३:४७-५३ |
| शुक्र ०४ | सं जॉन व्हियानी (पां) | : लेवीय २३:१, ४-११, १५-१६, २७, ३४-३७/मत्तय १३:५४-५८ |
| शनि ०५ | सं मरियेच्या ख्रिस्तमंदिराचे समर्पण (पां) | : लेवीय २५:१, ८-१७/मत्तय १४:१-१२ |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)